प्रा. (डॉ.) भालबा विभूते, एम.ए., पीएच.डी.
संचालक व विभाग प्रमुख
Prof. (Dr.) Bhalba Vibhute, M. A., Ph.D.
DIRECTOR & HEAD

B Accredited by NAAC (2009)

प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४.
DEPARTMENT OF ADULT AND CONTINUING EDUCATION & EXTENSION WORK
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004.

एसयु/एसीई/प्र.मान्यता/१२१४

दिनांक : २३/०७/२०१३

प्रति,
मा. प्राचार्य,
कला व वाणिज्य महाविद्यालय,
सातारा

**विषय :- ३ D ॲनिमेशन प्रमाणपत्र अभ्यासक्रम (६ महिने कालावधी) सुरू करणेबाबत...**

महोदय/महोदया,

आपण मागणी केल्याप्रमाणे प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभागामार्फत आपणास **३ D ॲनिमेशन प्रमाणपत्र अभ्यासक्रम (६ महिने कालावधी)** सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तरी, खालील बाबींची पूर्तता करून सदरचा वर्ग सुरू करण्याबाबत कार्यवाही सुरू करावी.

१. सोबत जोडलेल्या प्रवेश अर्जाच्या झेरॉक्स प्रती काढून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पात्रतेच्या दाखल्याची सत्यप्रत जोडून प्रवेश अर्ज आपल्याकडे ठेवावेत.
२. वर्गात ८०% उपस्थिती असणा-या विद्यार्थ्यांनाच परीक्षेस बसता येईल.
३. अभ्यासक्रमात दिल्याप्रमाणे थेअरी व प्रात्यक्षिक तास घेण्यात यावेत.
४. सदरचा वर्ग दि. १० ऑगस्ट २०१३ पासून सुरु होणे आवश्यक आहे.
५. महाविद्यालयाकडे जमा होणा-या शैक्षणिक शुल्काच्या २०% फी (रु ५०००/- च्या प्रमाणात ) आणि प्रवेश फी प्रत्येकी रू. २५/- व माजी विद्यार्थी संघटना फी प्रत्येकी रु. २५/- या प्रमाणे प्रत्येकी या पमाणे मा. वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे डी.डी. काढून तो विभागात दि. २० ऑगस्ट, २०१३ पर्यंत जमा करावा.
६. विद्यार्थ्यांची नावे दूरध्वनी क्र. व पत्यासहित व इंग्रजी आद्याक्षराप्रमाणे (इंग्रजी /मराठीमध्ये) तसेच अनु.जाती., अनु.जमाती.,विमुक्त भटक्या जमाती या संवर्गाचा उल्लेख करुन यादी व वेळापत्रक तसेच शिक्षकांची नावे व दूरध्वनी क्रमांक व पत्यासहित यादी डी.डी. सोबत विभागाकडे पाठवून द्यावे. विद्यार्थ्यांच्या यादींमधील नावांमध्ये नंतर कोणताही बदल करण्यात येणार नाही. सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार यादी द्यावी.
७. अभ्यासक्रमाचे रेकॉर्ड, जमा खर्चाच्या नोंदी स्वतंत्रपणे ठेवाव्यात आणि विद्यापीठाने मागणी केल्यास त्याची पूर्तता करावी.
८. विभागाच्या नियमाचे पालन होत नाही असे निदर्शनास आल्यास आपल्याला अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत दिलेली मान्यता काढून घेतली जाईल.
९. वर्ग सुरू करण्यापूर्वी किमान ७ दिवस अगोदर विभागात लेखी कळविणे आवश्यक आहे.
१०. प्रवेश फॉर्मवर असलेल्या नावात परीक्षा फॉर्म भरताना केलेला बदल ग्राहय धरला जाणार नाही. आपण दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे आणि यापुढेही आपला सततचा सहभाग मिळावा, ही अपेक्षा.

कळावे,

आपला विश्वासू,

प्रा.(डॉ.) भालबा विभूते
संचालक व विभागप्रमुख

ARTS ... COLLEGE
SATARA
Inward No. 41/384
Date 27 /VII/ 2013

डॉ. वी.बी. जाधव
28/07/13

Tel. : Office : (0231) 2605703, 6450347 □ Fax : 0091-231-2605703 □ E-mail : bhalba@indiatimes.com
2609150, 2609151
2605703
Vbhalba@gmail.com

Scanned by CamScanner

सातारा मराठा विद्या प्रसारक समाज,सातारा

# कला व वाणिज्य महाविद्यालय,सातारा

दि.   /०७/२०१३

# महत्त्वाची सूचना

कला व वाणिज्य महाविद्यालयातील बी.ए.भाग/बी.कॉम भाग–१,२,३ मधील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना कळविणेत येते की, गुरूवार दि. १७/ ०७ /२०१४ रोजी ठिक १०.१५ वा. **3D Animation** प्रमाणपत्र अभ्यासक्रम अंतर्गत **career Guidance in 3D Animation and VFX** या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जे विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी होउ इच्छितात अशा विद्यार्थ्यांनी कला व वाणिज्य महाविद्यालय नवीन इमारत (कोटेश्वर मैदानासमोर ) येथे वेळेत उपस्थित रहावे.

डॉ.भरत जाधव
प्रकल्प अधिकारी
**3 D Animation**

प्राचार्य
कला व वाणिज्य महाविद्यालय,
सातारा.

## Syllabus

Animation is an interesting and secure career option
The 06 Months Animation Program is an introduction to

2d Character design
3D modeling
Facial
Lighting
Texturing
Rigging
VFX
Animation

Using Maya™, one of the most popular software packages in the animation industry.
Students get to create their own character, props models and layouts and bring all of them together into a scene within the story,
What is animation?
The 12 principles
1 Squash and stretch
2 Anticipation
3 Staging
4 Straight ahead action and pose to pose
5 Follow through and overlapping action
6 Slow in and slow out
7 Arcs
8 Secondary action
9 Timing
10 Exaggerations
11 Solid drawing\ pose
12 Appeals

वाणिज्य महाविद्यालय सातारा

Scanned by CamScanner







Scanned by CamScanner

# ॲनिमेशन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

## कला व वाणिज्य महाविद्यालयात ॲनिमेशन कार्यशाळा उत्साहात

ॲनिमेशन कलेमुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली त्यामुळे या संधीचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन ॲनिमेशन तज्ञ किशोर जांबोरे यांनी केले. येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात थ्रीडी ॲनिमेशन व **VFX** कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे होते. यावेळी सातारा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संघटक जयेंद्र चव्हाण, संजय गंभीरा प्रमुख उपस्थित होते.

यावेळी किशोर जांबोरे म्हणाले, ॲनिमेशन ही एक कला त्याचा अर्थ विद्यार्थ्यांना अवगत झाला पाहीजे. आता थ्रीडी तंत्रज्ञानामुळे ॲनिमेशन सोपे झाले आहे. ॲनिमेशन हे नव्या जगातील रोजगाराचे प्रमुख क्षेत्र बनले आहे. याचे ज्ञान घेऊन विद्यार्थ्यांनी रोगगारक्षम बनावे. चित्रपट, शिक्षण, जाहीरात या क्षेत्रातही या ज्ञानाचा उपयोग होतो, त्यामुळे अर्थाजनासाठीही या अभ्यासक्रमाचा प्रयोग होऊ शकतो.

संजय गंभीरा म्हणाले, ॲनिमेशन क्षेत्र हे तंत्रज्ञानाचे क्षेत्र असल्याने यामध्ये कुशल मनुष्यबळाची गरज आहे. ही गरज या महाविद्यालयाने पुर्ण केली आहे. जयेंद्र चव्हाण म्हणाले, कला व वाणिज्य महाविद्यालयाने हा अभ्यासक्रम सुरू करून सातारा शहरात आधुनिक शिक्षणाची सोय केली आहे. माफक फीमध्ये दर्जेदार शिक्षणाची सोय झाल्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातले हे पहिलेच केंद्र असल्याची माहिती त्यांनी दिली.

प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे म्हणाले, पुणे, मुंबई, हैदाबाद याठिकाणी मिळणारे शिक्षण आज महाविद्यालयात उपलब्ध झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा हा अविष्कार विद्यार्थ्यांनी आत्मसात करून देशविदेशात यश मिळवावे.

यावेळी सन २०१३/१४ या शैक्षणिक वर्षाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. शंतनु जाधव, प्रियांका जाधव यांची मुंबई येथे इप्लस स्टुडीओमध्ये ॲनिमेशन तंत्रज्ञ म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. भरत जाधव, आभार केंद्र प्रशिक्षक सुरज कडव यांनी मानले. यावेळी सुशिल जाधव, ग्रंथपाल प्रा. एल. ए. पाटील, प्रा. संजय भोईटे, प्रा. उत्तमराव पाटील, प्रा. रतन वंजारे यांच्यासह विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

Scanned by CamScanner